# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-६१७/२०२२

**अपिलार्थी, श्री.किरीटभाई हेमचंद शहा**
**वर्षा शॉपिंग सेटर, अब्दुल शहा दर्ग्याच्य बाजुला**
**कल्याण शिळ रोड, गोलवली**
**डोंबिवली पूर्व, ता.कल्याण, जि.ठाणे**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त कळवा विभाग, ठाणे, सहायक पोलीस आयुक्त कळवा विभाग ठाणे यांचे कार्यालय, कळवा पोलीस स्टेशन, रिलायन्स मार्केट जवळ, पारसिक नगर, कळवा (प), जि.ठाणे ६०० ४०१

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, ठाणे शहर, पोलीस परेड मैदानाचे बाजुस, जेल रोड, ता.जि.ठाणे ४०० ६०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.११.२०२१ | ----- | १३.१२.२०२१ | ------ |

अपिलार्थी यांनी दि.१७.२.२०२२ रोजीच्या द्वितीय अपिल अर्जामध्ये माहिती न मिळण्याचे कोणतेही कारण नमूद केलेले नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. नितीन पगार, पोलीस निरिक्षक, मुंब्रा पोलीस ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"(घुगे पोलिस शिपाई बक्कल नं.७१०३ मुंब्रा पोलिस स्टेशन येथे कार्यरत त्यांच्या कार्यकालाची तपशिलवार माहिती मिळण्याबाबत व इतर माहिती.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र ब मध्ये, माहिती न मिळण्याचे कोणतेही कारण नमूद केलेले नाही.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थींना दि.८.१२.२०२१ रोजीचा पत्रान्वये माहिती पुरविली होती. त्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली यांनी दिलेल्या शासन परिपत्रकाच्या आधारे मा. अपर पोलीस आयुक्त (प्रशासन), ठाणे शहर यांनी पत्र क्र. ठाआ/अपोआ-प्रशासन/९९/२०१७ दि. ४.९.२०१७ अन्वये कुठल्याही कर्मचा-याची वैयक्तिक स्वरूपची माहिती माहितीच्या अधिकारामध्ये देता येत नसल्याचे स्पष्ट नमूद केलेले असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (त्र) मधील तरतुदीनुसार अर्जदार यांना आवश्यक मुद्दा क्र. १ ते ५ ची माहिती देता येत नाही.

याविरुध्द झालेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दि.२२.२.२०२२ रोजी आदेश पारित करून जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती मान्य करून अपिल निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन प्रस्तुतचे द्वितीय अपिल दाखल करण्यात आले आहे.

या अपिलामध्ये ज्या मुद्दयावर निर्णय घ्यावयाचा आहे तो असा की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक स्वरूपाची माहिती आहे किंवा कसे अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे

लक्षात येईल की, श्री. घुगे, पोलीस शिपाई, बक्कल नं. ७१०३, मुंब्रा पोलीस स्टेशन येथे कार्यरत यांच्या कार्यकालाची माहिती मागण्यात आली आहे. यामध्ये, (१) *त्यांचा मुख्यालयात कालावधी पूर्ण झाला होता का. (२) त्यांची मुंब्रा पोलीस स्टेशन ते मुख्यालय येथे कोणत्या कारणास्तव बदली झाली होती. (३) मुंब्रा पोलिस स्टेशन ते मुख्यालय ते मुंब्रा पोलीस स्टेशन ५ वर्षात ४ वेळा बदल्या होण्याचे कारण काय. (४) मुंब्रा पोलीस स्टेशन येथे जनरल डयुटी काय करतात व बिट कुठले करतात. (५) सध्या नियुक्ती ते कोठे आहेत.*

या विचारलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे लक्षात येईल की, अपिलार्थीनी श्री. घुगे, पोलीस शिपाई यांच्या बदल्यासंबंधाने व त्यांच्या कारणासंबंधाने ही माहिती मागितली आहे. कर्मचा-यांची नियुक्ती व त्यांची बदली हा भाग प्रशासनाशी संबंधित आहे. तो संबंधित कर्मचा-यांचा वैयक्तिक भाग आहे असे समजता येणार नाही. शासनाचे कर्मचारी हे कार्यरत असताना ते सार्वजनिक पदावर काम करत असतात त्यामुळे त्यांची नियुक्ती, त्यांचा कालावधी, त्यांचे स्थानांतर इ. बाबी या सार्वजनिक स्वरुपाच्या बाबी ठरतात. त्या वैयक्तिक स्वरूपाच्या ठरणार नाहीत. त्यामुळे वैयक्तिक स्वरूपाची माहिती आहे या कारणास्तव दिलेला नकार हा योग्य होता असे वाटत नाही.

सबब, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, कळवा विभाग, ठाणे यांनी दि.८.१२.२०२१ रोजीच्या पत्रात दिलेला निर्णय तसेच प्रथम अपिलिय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, ठाणे शहर यांनी दि.२२.२.२०२२ रोजी प्रथम अपिलामध्ये दिलेला निर्णय हा योग्य नसल्याने तो बाजूला सारण्यात येत आहे.

प्रकरणामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (ञ) मधील तरतुदीनुसार ही माहिती नाकारणे योग्य नाही. प्रकरण जन माहिती अधिकारी यांचेकडे पुनश्चः पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीनी मागितलेल्या माहितीसंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (ञ) च्या तरतुदी वगळता इतर तरतुदींच्या अनुषंगाने योग्य तो निर्णय पुढील ३० दिवसांचे आंत घ्यावा व त्याबाबत अपिलार्थीना माहिती पुढील १५ दिवसांत विनामुल्य पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, कळवा विभाग, ठाणे यांनी **अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(१) (ञ) च्या तरतुदी वगळता इतर तरतुदींच्या अनुषंगाने योग्य तो निर्णय पुढील ३० दिवसांत घेऊन त्याबाबत अपिलार्थी यांना माहिती त्यापुढील १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना त्यापुढील १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० मे, २०२४

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ